पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित इंडक्शन प्रोग्रॅममध्ये बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# ध्येय निश्चित केल्यास आयुष्याचा प्रवास सुखकर

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात इंडक्शन प्रोग्रॅम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी वक्तशीरपणा आणि शिस्त अंगीकारली पाहिजे. इतरांपेक्षा वेगळे बनण्यासाठी वाचन कौशल्य वृद्धिंगत करावे. विद्यार्थिदशेतच ध्येय निश्चित केल्यास आयुष्याचा प्रवास सुखकर होतो, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठ परिसरामधील मराठी, हिंदी, इंग्रजी आणि विदेशी भाषा अधिविभागांमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थी आणि प्रशासनातील अधिकारी यांचा संवाद घडवून आणण्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे इंडक्शन प्रोग्रॅमचे आयोजन राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत बी. ए. स्पोर्टस् हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. बी.ए. फिल्म मेकिंग हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. विद्यापीठ परिसर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी जिज्ञासा जागृत केली पाहिजे. विद्यार्थ्यांकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या असून त्याचा लाभ घेतला पाहिजे. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी क्रीडा अधिविभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे, उपकुलसचिव श्रीमती भक्ती नाळे उपस्थित होते.

सत्यदूत

# भगवान महावीर अध्यासनास श्रीमती सरोज चौगुले यांचेकडून

## दुर्मिळ ग्रंथ व १००००० रूपये इमारत निधीस भरीव देणगी

कोल्हापूर : रत्नाप्पा कुंभार नगर कोल्हापूर येथील श्रीमती सरोज चौगुले यांनी भगवान महावीर अध्यासनास आपल्या आई-वडीलांच्या स्मरणार्थ दुर्मिळ व प्राचीन १६ ग्रंथ दिले. तसेच नित्य वाचनासाठी त्यांचे धाकटे बंधू स्व. प्राचार्य डॉ. सूभाषचंद्र मादनाईक आणि जैष्ठ बंधूसमान मा. स्व. तात्यासाहेब पाटील यांचे स्मरणार्थ १२० पुस्तके दिली. त्याच बरोबर भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीसाठी त्यांनी रू १००००० चा धनादेश मा. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे दिला. याप्रसंगी त्यांचे अभिनंदन मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरूडॉ. पी. एस.पाटील तसेच मा. कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी



केले. या प्रसंगी प्रा. आर. बी. पाटील प्रा. डॉ. बी. डी. खणे व उपस्थित होते. श्रीमती सरोज चौगुले यांचा सत्कार मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शाल व विद्यापीठ बोधचिन्ह आणि ग्रंथ देऊन केला. भगवान महावीर अध्यासनाच्या पदविका व प्रमाणपत्र परिक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थीचे प्रामाणपत्र मा. कुलगुरू यांच्या हस्ते देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक समारोप व आभार प्रा. डॉ. विजय ककडे यांनी मांडले.